महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १८२ वे | दिनांक : २७/०६/२०२६ | वार : शनिवार

## 'ऑपरेशन टायगर'मुळे शिंदेंची ताकद वाढली; श्रीकांत शिंदेंना कॅबिनेट, तर राष्ट्रवादीलाही मंत्रिपदाची चर्चा



**मुंबई :** 'ऑपरेशन टायगर' यशस्वी करत उद्धव ठाकरे गटाच्या ६ खासदारांना आपल्या गोटात खेचणाऱ्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची दिल्ली दरबारात ताकद चांगलीच वाढली आहे. लोकसभेतील वाढलेले संख्याबळ लक्षात घेता येत्या २८ किंवा २९ जून रोजी होणाऱ्या संभाव्य केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारात शिवसेनेला अतिरिक्त मंत्रिपद मिळण्याची दाट शक्यता आहे. यात खासदार श्रीकांत शिंदे यांचे नाव कॅबिनेट मंत्रिपदासाठी आघाडीवर असून, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसलाही या फेरबदलात कॅबिनेटमध्ये सामावून घेतले जाणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराबाबत अधिकृत घोषणा झालेली नसली, तरी दिल्लीतील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

सध्या केंद्रात शिवसेनेचा एकच मंत्री (प्रतापराव जाधव) आहे. मात्र, 'ऑपरेशन टायगर'नंतर वाढलेल्या बळामुळे शिवसेनेला आता एक कॅबिनेट आणि दोन राज्यमंत्री अशी एकूण तीन मंत्रिपदे मिळण्याची चर्चा सुरू आहे. २०२४ मध्ये एनडीए सरकार स्थापन होताना शिवसेनेला कॅबिनेट मंत्रिपदाची ऑफर होती, मात्र डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ती नाकारली होती. आता बदललेल्या परिस्थितीत पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या आग्रहाखातर ते हे पद स्वीकारतील, अशी दाट चर्चा आहे. विद्यमान केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांच्याकडील 'आरोग्य राज्यमंत्रिपद' काढून घेऊन ते शिवसेनेच्याच नव्या खासदाराला दिले जाऊ शकते. मात्र, त्यांचा 'आयुष मंत्रालयाचा स्वतंत्र प्रभार' कायम राहील, असेही सूत्रांकडून समजते. दरम्यान, राज्यमंत्रिपदासाठी धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांचे नाव चर्चेत आहे.

उबाठा गटातून नुकतेच शिवसेनेत दाखल झालेले ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांचेही नाव मंत्रिपदाच्या शर्यतीत होते. मात्र, मुंबईत पत्रकारांना केलेली जाहीर अश्लील शिवीगाळ आणि 'बॉम्ब' टाकून मारण्याच्या धमकीमुळे त्यांची प्रतिमा मलिन झाली आहे. हायकमांड त्यांच्या या मुजोर वर्तनामुळे प्रचंड नाराज असून, त्यामुळे त्यांची मंत्रिपदाची संधी हुकल्याचे बोलले जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधीवेळी राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) पदाची ऑफर देण्यात आली होती. मात्र, प्रफुल्ल पटेल यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याने यापूर्वी कॅबिनेट पद भूषवले असल्याने, राष्ट्रवादीने 'कॅबिनेट'चा आग्रह धरत ती ऑफर नाकारली होती.

आता या विस्तारात राष्ट्रवादीला कॅबिनेट मंत्रिपद दिले जाण्याची चिन्हे असून, यासाठी प्रफुल्ल पटेल यांचे नाव निश्चित मानले जात आहे. काही कारणास्तव तसे न झाल्यास प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना संधी मिळू शकते.

## 'मराठा समाजाचा कार्यक्रम, तुम्ही बसलात तर वाद होईल' : अभिमन्यू पवारांच्या विधानावर मेधा कुलकर्णींचा संताप



**पुणे :** 'सारथी' संस्थेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या यूपीएससी, एमपीएससी व इतर स्पर्धा परीक्षांमधील यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी आणि आमदार अभिमन्यू पवार यांच्यातील नाराजीनाट्य समोर आले आहे. पहिल्या रांगेत बसण्याच्या कारणावरून झालेल्या वादानंतर नाराज झालेल्या मेधा कुलकर्णी थेट मंचावरून निघून गेल्या होत्या. या संपूर्ण प्रकरणावर आमदार पवार यांनी आपली प्रतिक्रिया दिल्यानंतर, मेधा कुलकर्णी यांनीही आपली भूमिका स्पष्ट करत, "मी अभिमन्यू पवार यांना माफ करते, मात्र त्यांनी आत्मपरीक्षण करावे," असा सूचक सल्ला दिला आहे.

खासदार मेधा कुलकर्णी म्हणाल्या, परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मुलांचे अभिनंदन करण्यासाठी चांगल्या मनःस्थितीत मी त्या कार्यक्रमाला गेले होते. कार्यक्रमात पहिल्या रांगेत काही रिकाम्या खुर्च्या होत्या. माधुरीताई किंवा अन्य मंत्रीमहोदय आलेले नव्हते त्यामुळे खुर्च्या रिकाम्या होत्या. अधिकारी म्हणत होते, जर त्या खुर्च्या रिकाम्या असतील तर मेधा कुलकर्णी यांचा प्रोटोकॉल आहे. माझ्याकडे एका कमिटीचे अध्यक्षपद आहे, म्हणून ते मला म्हणत होते इथे बसा, मी म्हणाले की नरेंद्र पाटीलही बसू शकतात, महामंडळाचे अध्यक्ष आहेत.

पुढे मेधा कुलकर्णी म्हणाल्या, अभिमन्यू पवारांना तिथे बसायचे होते, म्हणून धावाधाव चालली होती, मी बसतो तर अधिकारी म्हणाले की यांच्यानंतर मेधा कुलकर्णींचे नाव येते तर ते (अभिमन्यू पवार) असे म्हणाले की, हा कार्यक्रम मराठा समाजाचा आहे, तुम्ही इथे बसलात तर वाद होईल. हा कार्यक्रम नक्कीच अभिमानास्पद कामगिरी करणाऱ्या मराठा समाजातील कर्तृत्वान मराठा समाजातील मुलांचा आहे, त्यांना शाबासकी देण्याचा कार्यक्रम आहे. कार्यक्रम शासनाचा आहे, शासकीय प्रोटोकॉल नुसार खुर्च्यांची रचना केलेली असते. जात बघून रचना केलेली नसते.

मी कुठेही गेले तरी हिंदू म्हणून जगले पाहिजे, असे आवाहन करते जातीचा विषय आला कुठे? असा सवाल मेधा कुलकर्णी यांनी उपस्थित केला. त्या म्हणाल्या, अभिमन्यू पवार जेव्हा निवडणुकीला सामोरे जात होते, तेव्हा त्यांनी माझ्याकडे या ब्राह्मण समाजाचा मेळावा ठेवणार आहे, असे म्हटले. तब्येत ठीक नव्हती तरी लांबचा प्रवास करुन त्यांच्यासाठी गेले. ब्राह्मण समाजाला अभिमन्यूजींच्या पाठीशी राहण्याचे आवाहन केले. समाजाचा प्रश्न येत नाही, सगळ्यांनी विचारांच्या पाठीशी राहिले पाहिजे, असे आवाहन त्या कार्यक्रमात केले होते.

आज देशात परिस्थिती वेगळी आहेत, आव्हाने वेगळी आहेत, प्रश्न वेगळी आहेत. ज्याला उत्तर देण्यासाठी हिंदू समाज येईल का हा मुद्दा आहे. एकमेकांच्या जाती काढून काय फायदा आहे. कार्यक्रम वेगळा चाललाय, तुम्ही कशावरुन बोलताय, मला सफोकेट झाले, मला चुकीचे वाटले, मी तिथून निघून आले, असे मेधा कुलकर्णींनी म्हटले.

## लोहगड हत्या प्रकरण : खटला जलदगती न्यायालयात चालणार; ॲड. उज्ज्वल निकमांची एंट्री; सिया केतनच्या अडचणीत वाढ



**पुणे :** राज्यभरात खळबळ उडवून देणाऱ्या पुण्याच्या लोहगड हत्या प्रकरणाने पुरुषांवरील अत्याचाराची एक अतिशय गंभीर बाजू समाजासमोर आणली आहे. स्वतःच्याच होणाऱ्या नवऱ्याला (केतन अग्रवाल) आपल्या प्रियकराच्या मदतीने कट रचून निर्दयीपणे संपवल्याचा धक्कादायक प्रकार यात उघडकीस आला आहे. या भीषण गुन्ह्याप्रकरणी पुणे पोलिसांनी मुख्य आरोपी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन या दोघांनाही बेड्या ठोकल्या असून, या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला आहे.

या प्रकरणाची पुणे पोलिसांकडून अत्यंत कसून चौकशी सुरू असून, दररोज नवनवीन आणि धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी आता आपला मोर्चा सियाच्या कुटुंबाकडे वळवला असून, सियाच्या भावालाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. तर दुसरीकडे, आपला मुलगा गमावलेल्या केतन अग्रवालच्या कुटुंबीयांनी न्यायाच्या आशेने थेट राज्याच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेत त्यांना साकडे घातले आहे.

लोहगड येथे घडलेल्या केतन अग्रवाल यांच्या दुर्दैवी हत्या प्रकरणी, त्यांचे वडील विशाल अग्रवाल यांनी आज पुण्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत आपल्या मुलाला न्याय मिळवून देण्याची मागणी केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी अग्रवाल कुटुंबीयांचे सांत्वन करत, त्यांना न्याय देण्यासाठी सरकारकडून कोणतीही कसूर सोडली जाणार नाही आणि या प्रकरणातील दोषींना अत्यंत कठोर शिक्षा व्हावी यासाठी आम्ही पूर्णपणे कटिबद्ध आहोत, असे भक्कम आश्वासन दिले.

अग्रवाल कुटुंबीयांनी या खटल्यासाठी जलदगती न्यायालयाची स्थापना आणि विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची केलेली मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ मान्य केली आहे. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी विधी व न्याय विभागाच्या सचिवांना तातडीने आवश्यक ते निर्देश दिले असून, स्वतः ॲड. उज्ज्वल निकम यांनीही या न्यायदानाच्या प्रक्रियेत विशेष सरकारी वकील म्हणून काम पाहण्यास आपली संमती दर्शवली आहे.

दरम्यान, मृत केतनचे वडील विशाल अग्रवाल यांनी मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर माध्यमांना प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, सियाचा भाऊ साहिल आणि तिचा प्रियकर हे जवळचे मित्र होते, त्यामुळे केतनच्या हत्येचा प्लॅन हा आणखी काही जणांना माहीत असण्याचा संशय आहे. तसेच केतन डोक्याला विग वापरायचा ही माहिती लग्नाच्या आधी सियाल आणि तिच्या कुटुंबाला देण्यात आली होती. परंतु, हत्या करण्याचे हे काही कारण असू शकत नाही. लग्नासाठी नकार देणं हे सियासाठी खूप सोपे होते, त्यासाठी तिने केतनची हत्या करण्याची गरज नव्हती, असे विशाल अग्रवाल यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ जून २०२६


## पीएमश्री जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा, केसरजवळगा येथे राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी



**(मुरुम, प्रा. सुधीर पंचगल्ले) :** पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, केसरजवळगा येथे सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणाचे महान पुरस्कर्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी शाहू महाराजांच्या जीवनकार्याला अभिवादन करत त्यांच्या शिक्षणविषयक धोरणांचा, सामाजिक समतेसाठी केलेल्या कार्याचा तसेच वंचित, दुर्बल आणि बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण आढावा घेतला.यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष अजीज शेख, मुख्याध्यापक बालाजी भोसले, सहशिक्षक सुनील राठोड, विशेष शिक्षक सहदेव बोडरे, गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, शिक्षणप्रेमी नागरिक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, अंगणवाडी सेविका तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनावर आधारित मनोगते व्यक्त केली. तसेच त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन शिक्षण, समता, बंधुता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव प्रत्येकाने जोपासली पाहिजे, असा संदेश देण्यात आला.उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शाहू महाराजांच्या विचारांचा आदर्श घेऊन शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचा आणि समाजाचा सर्वांगीण विकास करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे वातावरण प्रेरणादायी व उत्साहपूर्ण होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी उपस्थित सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात राजर्षी शाहूंना अभिवादन !!



**जालना :** छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. मंगल मुळे यांनी राजर्षी शाहू यांच्या सामाजिक, शैक्षणिक व लोककल्याणकारी कार्याचा आढावा घेतला. शाहूंच्या विचारांचा आदर्श विद्यार्थ्यांनी जीवनात अंगीकारण्याचे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी डॉ. कविता प्राशर यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या शिक्षणप्रेम, सामाजिक समता आणि लोकहितकारी धोरणांचे महत्त्व अधोरेखित केले. सूत्रसंचालन डॉ. चंद्रकांत धोत्रे यांनी केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**


## श्रीकृष्ण विद्यालयाला माजी विद्यार्थ्यांकडून ९६ हजारांची मदत



**गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे)** : उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथे असलेल्या श्रीकृष्ण विद्यालयातील १९९६ च्या एस. एस. सी. ला असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव मा. डॉ. दामोदर पतंगे यांना समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कृतज्ञता निधी म्हणून ९६ हजाराचा निधी नुकताच सुपुर्द करण्यात आला. अगदी स्वातंत्र्य पूर्व काळात, निजामराजवटीत १९२७ मध्ये ज्या शाळेची सुरुवात झाली, अशा या श्रीकृष्ण शिक्षण संस्थेत १९९६ मध्ये एस. एस. सी. झालेले आणि १९९८ मध्ये एच.एस.सी .झालेले विद्यार्थी एकत्र येऊन एक छोटा खाणी गेट-टुगेदर चा कार्यक्रम आयोजित करून, या कार्यक्रमांमध्ये मा. संस्थाचालक, संस्था सदस्य, तसेच वेगवेगळे पदाधिकारी शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यासह ज्यांच्या करवी शिक्षणाचे धडे घेण्यात आले, अशा गुरुजनांना, जेकी निवृत्त झालेले असतील, किंवा सद्यस्थितीत कार्यरत असतील, अशांना या कार्यक्रमांमध्ये निमंत्रित करून त्यांचा छोटा खाणी सन्मान करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.त्याच कार्यक्रमात विद्यार्थ्यांतर्फे ९६००० ची निधी संस्थेला देण्याचे जाहीर करण्यात आले होते, तोच जाहीर केलेला निधी नुकताच संस्थेचे सचिव डॉ. दामोदर काका पतंगे यांना कृतज्ञतेने सुपूर्द करण्यात आला.

यावेळी संचालक सदस्य डॉ. सागरजी पतंगे, मुख्याध्यापक रविराज पाटील, उप मुख्याध्यापक श्री भालेराव, पर्यवेक्षक श्री पाटील , प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री पुरंत त्याचबरोबर 1996 च्या बॅच मधील श्री सुधीर थोरात, अमोल चव्हाण, राम मोरे, सुनील चौधरी, गोविंद चौधरी, डॉ.पुरी, बापू गायकवाड, एल. आर .पाटील, बाळासाहेब माळगे, तम्मा शेटगार आदींची उपस्थिती होती.


**१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी**

**शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस**

**DMLT**
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

**PGDMLT**
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

**X-RAY**
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

**C.T.SCAN**
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

**E.C.G.**
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

**O.T. TECHNICIAN**
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

**PG RADIOLOGY**
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

**रेडिओलॉजी**
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

**फिजिओथेरपी**
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

**ऑप्थोमेट्री**
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

**9405109103 | 8830838903**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ जून २०२६


## केवडा

केवड्याचे झाड
वाढते समुद्रकिनारी
काटेरी लांब पाने
जणू वाटते तलवारी

केवडयाची फुलं
दिसतात किती छान
सत्यनारायणाच्या पूजेत
असतो त्याचा मान

केवडयाचा मोहक सुगंध
भरतो मनामनात
सापांची वस्ती
सदा केवड्याच्या बनात

पांढरा व पिवळा
छान केवड्याचा रंग
टोकदार पानात
लपले नाजूक अंग

अत्तर व साबण
बनते केवड्यापासून
आयुर्वेदही गातो
केवड्याचे गुण ठासून



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## तडतडा तोडले बंधन

आरक्षणाचे पहिले जनक,
राजर्षी छत्रपती शाहू महाराज.
सक्तीचे मोफत शिक्षण देऊन,
चढविले बहुजनांवर सरताज.

रूढी परंपरा मोडून काढत,
बहुजनांना दिले मोफत शिक्षण.
सक्तीच्या शिक्षणाने संस्थानी,
होऊ दिले नाही कोणाचे भक्षण.

न्याय हक्क समतेने सर्वांना,
शिक्षण घेण्याची दिली संधी.
वंचित शोषित घटकांना शिकवून,
जातीभेदास घातले कायम बंदी.

शाहू महाराजांच्या संस्थानात
जातीभेदास नव्हता थारा,
आनंदाने वाहत होता इथे,
न्याय हक्क समानतेचा वारा.

शोषित वंचितांचे रक्षण करून
जातीप्रथेचे तडतडा तोडले बंधन.
अशा लोककल्याणकारी राजांना,
नतमस्तक होऊन मी करतो वंदन.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# स्वार्थासाठी सत्तांतर की राष्ट्रहित?

**मि**त्रांनो जगात सर्वश्रेष्ठ लोकशाही ही भारतामध्ये आहे. यासाठी सर्वप्रथम मी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करतो. लोकांनी लोकांच्या हितासाठी लोकांच्याकडून चालवलेली सत्ता म्हणजे लोकशाही होय. म्हणजे यामध्ये लोककल्याणकारी कार्य आणि राज्य चालवण्याचं स्वप्न भारतीय संविधानामध्ये रेखाटलं आहे. त्याचं कायद्यात रूपांतर केलं आहे. यामध्ये सर्व धर्म समभाव प्रत्येक व्यक्तीला समान स्वातंत्र्य हे बहाल केलं आहे. इतकी पारदर्शी लोकशाही मानवी मूल्य जपण्यासाठी निर्माण झाली. या इतक्या चांगल्या लोकशाही मूल्यांमध्ये सुद्धा आता अराजकता, स्वार्थी, भ्रष्टाचारी,राष्ट्रद्रोह,खून, अत्याचार अशा पद्धतीचे कार्य करणाऱ्या लोकांच्या हातामध्ये सत्ता जाताना दिसते आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये राजकीय पक्ष, विचारधारा आणि नेतृत्व यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. परंतु सध्याच्या राजकारणात एक चिंताजनक प्रवृत्ती वाढताना दिसते आहे.सत्तेसाठी वारंवार पक्षांतर करणे आणि झेंडे बदलणे. त्यामुळे एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो: ही प्रक्रिया राष्ट्रहितासाठी आहे की केवळ वैयक्तिक स्वार्थासाठी? लोकप्रतिनिधी जनतेच्या विश्वासावर निवडून येतात. मतदार त्यांच्या विचारसरणी, जाहीरनामे आणि तत्त्वांवर विश्वास ठेवून त्यांना मत देतात. मात्र निवडून आल्यानंतर काही नेते सत्तेच्या, पदाच्या किंवा वैयक्तिक फायद्याच्या आशेने पक्षांतर करतात. अशा कृतीमुळे मतदारांच्या विश्वासाला तडा जातो आणि लोकशाहीची मूल्ये कमकुवत होतात.निश्चितच, प्रत्येक पक्षांतर चुकीचेच असते असे म्हणता येणार नाही. एखाद्या पक्षाने आपल्या मूलभूत तत्त्वांचा त्याग केला असेल, भ्रष्टाचार वाढला असेल किंवा जनहिताकडे दुर्लक्ष होत असेल, तर विचारपूर्वक आणि पारदर्शकपणे घेतलेला निर्णय योग्य ठरू शकतो. परंतु अशा निर्णयामागे राष्ट्रहित आणि जनतेचे कल्याण हेच प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे. ते असताना दिसत नाही.आज अनेकदा पक्षांतरानंतर लगेच मंत्रीपदे, महत्त्वाची पदे किंवा राजकीय लाभ मिळताना दिसतात. त्यामुळे जनतेच्या मनात हा प्रश्न निर्माण होतो की हे बदल राष्ट्रहितासाठी आहेत की वैयक्तिक स्वार्थासाठी? लोकशाहीमध्ये विश्वास टिकवून ठेवण्यासाठी राजकीय नैतिकता आणि पारदर्शकता अत्यंत आवश्यक आहे.राष्ट्रहित म्हणजे केवळ सरकार बदलणे नव्हे; तर देशाचा सर्वांगीण विकास, संविधानाचा सन्मान, सामाजिक सलोखा, आर्थिक प्रगती आणि नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा करणे होय. कोणताही राजकीय निर्णय या निकषांवर खरा उतरला, तरच तो राष्ट्रहिताचा मानला जाऊ शकतो.आज गरज आहे ती व्यक्तिपूजेपेक्षा विचारांना महत्त्व देण्याची, सत्तेपेक्षा सेवेला प्राधान्य देण्याची आणि पक्षापेक्षा राष्ट्राला सर्वोच्च मानण्याची. जनतेनेही सजग राहून राजकीय नेत्यांच्या कृतींचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. कारण लोकशाहीमध्ये अंतिम शक्ती ही जनतेकडेच असते.सत्ता येते-जाते, पक्ष बदलतात, झेंडेही बदलतात; पण राष्ट्र सर्वोच्च राहिले पाहिजे. स्वार्थासाठी होणारे पक्षांतर लोकशाहीला कमकुवत करते, तर राष्ट्रहितासाठी घेतलेले तत्त्वनिष्ठ निर्णय लोकशाही अधिक मजबूत करतात. म्हणून प्रत्येक राजकीय नेत्याने स्वतःला एकच प्रश्न विचारला पाहिजे—"माझा निर्णय माझ्या स्वार्थासाठी आहे की भारताच्या भविष्यासाठी?" आज ही भावना मुळात मोडीत निघालेली आहे. एका बाजूला ईडीची भीती आहे, दुसऱ्या बाजूला सत्तेची भीती आहे, तिसऱ्या बाजूला पदाची मीळेल नाही मिळेल.याची भीती आहे,चौथ्या बाजूला पक्ष बदललेल्या नंतर स्वास्थ्य, सुरक्षितता राहील अशा अनेक भावभावनांच्या भीती आणि आनंदाचं मिश्रण पाहायला मिळतय.मला वाटतं निष्कलंक व्यक्ती,भीतीमुक्त मंत्री अशी समाज व्यवस्था निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. नाहीतर भविष्य काळामध्ये एका बाजूला प्रचंड श्रीमंत असणारी अनेक माणसं असतील तर दुसऱ्या बाजूला दारिद्यात पिचणारी लाखो लोक असतील तेव्हा देशामध्ये अरजक्ता मासेल आपण बाजूच्या देशाचं चित्र पाहिलं आहे ते भयानक होतं आणि त्याची प्रतिकृती भारतात कधीच येऊ नये त्यासाठी प्रत्येक नागरिकांनी सजग राहणं गरजेचे आहे. जीमूल्य घेऊन भारतीय संविधान निर्माण झालं त्या प्रत्येक मूल्याचं धर्म म्हणून प्रत्येकाने पालन करायला पाहिजे. त्या दृष्टीने वाटचाल समाज करील अशी आशा वाटते..

**चिंतन:- भूमिपुत्र वाघ**


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी
D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology
- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला अॅडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ जून २०२६


# आरक्षणाची अंमलबजावणी उशिरा झाली - प्रा. डॉ. बालाजी कोनाळे



**गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) :** राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी येथे आयोजित केलेल्या राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी त्यांच्यासमवेत व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी. एम. राठोड होते तर प्रमुख उपस्थित प्रा. डॉ. महादेव खोत आणि प्रा. एन. जे . पवार उपस्थित होते. ते पुढे म्हणाले की राजर्षी शाहू महाराज हे दृष्टे समाजसुधारक होते, एवढेच नव्हे तर समाजाच्या प्रगतीची अचूक नस ओळखणारा एकमेव राजा म्हणून त्यांची आपल्याला नोंद घ्यावी लागेल. आरक्षणाचे जनक म्हणूनही त्यांची नोंद घेतली पाहिजे. अलक्षित , दुर्लक्षित समाजाला प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, त्यांना मुख्य प्रवाहात सामावून घेतले पाहिजे या भावनेतून स्वतःपासून आरक्षणाची सुरुवात करणारा माणूस म्हणून त्यांचे मोठेपण वेगळे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एका जाहीर सभेत सांगितले होते की जयंती साजरीच करायची असेल तर माझी करू नका तर राजर्षी शाहू महाराजांची करा यातच शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्वाचे मोठेपण दडलेले आहे. छत्रपती शाहू महाराजांनी आरक्षण तर लागू केलेच पण स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्याला संविधानक दर्जा दिला , पण वेळोवेळीच्या प्रचलित सरकारने आरक्षण उशिरा लागू केले . त्यामुळे हवा तसा विकास,बदल आणि छोट्या छोट्या घटकांना अपेक्षित लाभ मिळू शकला नाही. एकिकृत समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी दर्जाची समान झसंधी मिळणे आवश्यक असते दुर्दैवाने ती मिळण्याच्या अगोदरच आरक्षणाचे उपवर्गीकरण करून आरक्षणच संपुष्टात आणण्याचा घाट घातला जात आहे याचा विचार तुमच्या माझ्या सारख्या बुद्धिवंतांनी आणि सुशिक्षितांनी केला पाहिजे असे आवाहन करून आपल्या छोटेखानी व्याख्यानातून त्यांनी राजर्षी शाहू महाराज यांचे विविध पैलू उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. राजाराम निगडे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. डॉ. डी. पी. चव्हाण यांनी केले. प्राचार्य डॉ. जी. एम. राठोड यांच्या अध्यक्षीय समारोपानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.






# बेईमान झाली दुनिया

बेईमान झाली दुनिया, सत्याला लागले घाव,
थांब सखे, इतिहासातच आहे याचा ठाव.

बुद्धांनी सत्य सांगितले, करुणेचा दिला प्रकाश,
तरीही त्यांच्या वाट्याला आला विरोधाचा सहवास.

कबीरांनी शब्दांनी फोडले भेदांचे सारे जाळे,
तरीही खोट्या अहंकाराने त्यांच्यावर घावच घातले.

शिवरायांनी स्वराज्याचा दीप गगनात पेटविला,
संकटांच्या वादळांनीही त्यांचा निर्धार न मोडविला.

फुल्यांनी शिक्षणाचा सूर्य अंधारात उगविला,
अज्ञानाच्या सावल्यांनी त्यांचाही छळ केला.

बाबासाहेबांनी समतेचा महामंत्र जगाला दिला,
तरी द्वेषाच्या बाजाराने त्यांचाही अपमान केला.

सत्याच्या वाटेवरती काट्यांचा असतो साज,
महामानवांनाही चुकला नाही संघर्षांचा राज.

पण इतिहास त्यांचाच होतो,
ज्यांनी जनतेसाठी आयुष्य झिजवले,
स्वतःच्या सुखाला दूर सारून,
दुःखितांच्या अश्रूंना पुसत जगले.

हजारो पिढ्या जन्मल्या, हजारो पिढ्या गेल्या,
काळाच्या ओघात त्यांच्या आठवणीही विरल्या.

मोजकीच नावे राहिली युगांच्या ध्यानात,
कारण ती उभी राहिली माणुसकीच्या सन्मानात.

बेईमान झाली दुनिया म्हणून नको मनात खेद,
सत्य, न्याय, माणुसकी हाच जीवनाचा खरा वेद.

जगण्याला अर्थ त्याचाच, जो इतरांसाठी झिजतो,
इतिहासाच्या पानांवर तोच सुवर्णाक्षरांनी लिहिला जातो.



डॉ. बाळासाहेब लिहिणार


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ जून २०२६

## श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल भारतमाता नगर बीड बायपास छत्रपती संभाजीनगर शाळेत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अध्यक्ष स्थानी श्री तिरुपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष स्थानी श्री किरण पाटील साहेब तसेच प्रमुख पाहुणे म्हणूनकोषाध्यक्ष श्री दादासाहेब जाधव पाटील साहेब उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. पुष्पा पवार मॅडम, सहशिक्षक श्री शिंदे सर, मनगटे सर, घुले सर, पडवाल सर, खैरे सर, गायकवाड सर, जुबडे सर, धनवे सर, उपस्थित होते. मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले. विद्यार्थ्यांना छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याची माहिती प्रमुख पाहुणे यांनी दिली. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी भाषणे केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री घुले सर तर आभार प्रदर्शन श्री मनगटे सर यांनी केले.

## खासदार रामराव वडकुते यांनी घेतली संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांची भेट



**हिंगोली (गोपाल सातपुते) :** हिंगोली जिल्ह्याचे राज्यसभा खासदार रामरावजी वडकुते यांनी शुक्रवारी देशाची राजधानी दिल्ली येथे भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी संरक्षण मंत्र्यांचा सत्कार करत हिंगोली जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या विकासकामांवर आणि प्रलंबित समस्यांवर सविस्तर चर्चा केली.

या प्रसंगी खासदार वडकुते यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांना हिंगोली जिल्ह्यातील जगप्रसिद्ध आठवे ज्योतिर्लिंग असलेल्या औंढा नागनाथ संदर्भात माहिती दिली. तसेच, त्यांना औंढा ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी हिंगोली जिल्ह्यात येण्याचे भावपूर्ण आमंत्रण दिले. संरक्षण मंत्र्यांसोबत झालेल्या या महत्त्वपूर्ण बैठकीत खासदार वडकुते यांनी जिल्ह्यातील काही प्रमुख प्रश्नांकडे त्यांचे लक्ष वेधले. यावर सकारात्मक प्रतिसाद देत केंद्रीय स्तरावरील प्रश्न सोडविण्याचे आश्वासन संरक्षण मंत्र्यांनी दिले.

## कालिकादेवी विद्यालयामध्ये, राजर्षी शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी..




**शिरूर कासार :** दि. २६ जून २०२६ शुक्रवार रोजी कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये आरक्षणाचे जनक'राजर्षी शाहू महाराज'यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रा.महारुद्र डोंगरे यांच्या हस्ते,राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. महारुद्र डोंगरे सर यांनी आपल्या भाषणातून सांगितले की,'शाहू महाराजांचे सामाजिक कार्य हे प्रेरणादायी आहे.विशेषतः त्यांनी बहुजन समाजात शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला होता. कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले होते.स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी आदेश काढला होता.जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा संमत केला होता. विशेष म्हणजे कोल्हापूर संस्थानात राधानगरी धरणाची उभारणी करून तीन वाजता प्रश्न कायमचा सोडविला.शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून दिले.शेती आणि उद्योग या क्षेत्रात महाराजांनी नवे नवे प्रयोग केले.आणि शेतीच्या आधुनिकीकरणाला पाठबळ दिले होते.त्याचबरोबर संगीत,चित्रपट,चित्रकला,लोक कला आणि मल्लविद्या या क्षेत्रातील कलावंतांना राजश्री देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वाचे कार्य केले होते.हे आपणास विसरता येणार नाही.असेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी श्री रवींद्र बडे,जयेंद्र निकम,नितीन बहिर,श्रीमती अनिता लाटे मॅडम,आदिनाथ काशिद,गौतम भोसले या सर्वांनी राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्प वाहून विनम्र अभिवादन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.नारायण तांबे यांनी केले.तर आभार प्रदर्शन जयेंद्र निकम यांनी केले.यावेळी प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |